C-37

**नगरपालिका, महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील पथदिवे व पाणी पुरवठा योजनांमध्ये ऊर्जा बचतीसाठी संयंत्रे आस्थापित करण्यासाठी अर्थसहाय्याच्या योजनेसाठीच्या मार्गदर्शक सूचना.**

**अ) पथदिवे-**

१. नगरपालिका / महानगरपालिका यांच्याकडील पथदिव्यांमध्ये वीज बचतीसाठी ऑटो सेन्सर, टायमर, स्काडा, वेब बेस्ड मॉनिटरींग सिस्टम अशा यंत्रणा उभारण्यासाठी महाऊर्जातर्फे जास्तीत जास्त रु. २० लाख एवढे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. प्रकल्प मोठ्या प्रमाणात राबविण्यासाठी नगरपालिका / महानगरपालिका यांनी देखील त्यामध्ये जास्तीत जास्त आर्थिक तरतूद लाभार्थी हिस्सा म्हणून करावी.

२. प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. त्यासाठी महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थांकडून सल्ला घेण्यात यावा.

३. सदर प्रकल्प राबविण्यासाठी नगरपालिका/महानगरपालिका यांनी त्यांच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी. नगरपालिका / महानगरपालिका यांनी महाऊर्जाकडे प्रस्ताव पाठवितांना वरीलप्रमाणे त्यांच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी व सक्षम प्राधिकाऱ्याचे या सूचनांसोबत जोडलेले विहित प्रमाणपत्र जोडावे.

४. अ, ब, व क वर्ग नगरपालिकांमधून एका महसूल विभागातील एका नगरपालिकेस अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. इच्छुक नगरपालिकांनी त्यांचे प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत महाऊर्जास पाठवावेत. विभागीय आयुक्तांनी शिफारशीसह प्रस्ताव महाऊर्जाकडे पाठवावा.

५. सदर योजनेत नगरपालिका/महानगरपालिका यांची निवड करताना ज्या नगरपालिका/महानगरपालिका यांनी त्यांच्या हिश्श्याची तरतूद केली आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६. महानगरपालिकांनी त्यांचे प्रस्ताव हिश्श्याची तरतूद करुन प्रमाणपत्रासह महाऊर्जास परस्पर पाठवावेत.

७. प्रस्तावासोबत प्रकल्प अहवाल, आवश्यकतेनुसार परिशिष्ट १ व २ मधील माहिती तसेच परिशिष्ट – ३ नुसार हमीपत्र जोडण्यात यावे.

८. महाऊर्जातर्फे आवश्यक ती छाननी करण्यात येऊन प्रकल्पास तत्वतः मंजुरी देण्यात येईल. शासनातर्फे निधी प्राप्त झाल्यावर संबंधित घटकास सुपूर्द करण्यात येईल.

**ब) पाणीपुरवठा योजना –**

१. नगरपालिका / महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणीपुरवठा योजनांमध्ये पंपाची कार्यक्षमता नियमितपणे दर्शविण्यासाठी स्काडा, वेब बेस्ड मॉनिटरींग यंत्रणा उभारण्यासाठी महाऊर्जातर्फे रु. ५ लाखापर्यंत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. नगरपालिका / महानगरपालिका / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी देखील त्यामध्ये जास्तीत जास्त आर्थिक तरतूद लाभार्थी हिस्सा म्हणून करावी.

२. प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. त्यासाठी महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थांकडून सल्ला घेण्यात यावा.

३. सदर प्रकल्प राबविण्यासाठी नगरपालिका/महानगरपालिका यांनी त्यांच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी. नगरपालिका / महानगरपालिका यांनी महाऊर्जाकडे प्रस्ताव पाठवितांना वरीलप्रमाणे त्यांच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी व सक्षम प्राधिकाऱ्याचे या सूचनांसोबत जोडलेले विहित प्रमाणपत्र जोडावे.

४. अ, ब, व क वर्ग नगरपालिकांमधून एका महसूल विभागातील एका नगरपालिकेस अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. इच्छुक नगरपालिकांनी त्यांचे प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत महाऊर्जास पाठवावेत. विभागीय आयुक्तांनी शिफारशीसह प्रस्ताव महाऊर्जाकडे पाठवावा.
५. सदर योजनेत नगरपालिका/महानगरपालिका यांची निवड करताना ज्या नगरपालिका/महानगरपालिका यांनी त्यांच्या हिश्श्याची तरतूद केली आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल.
६. महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी त्यांचे प्रस्ताव हिश्श्याची तरतूद करुन प्रमाणपत्रासह महाऊर्जास परस्पर पाठवावेत.
७. प्रस्तावासोबत प्रकल्प अहवाल, आवश्यकतेनुसार परिशिष्ट १ व २ मधील माहिती तसेच परिशिष्ट – ३ नुसार हमीपत्र जोडण्यात यावे.
८. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी प्रकल्प राबविण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घ्यावी. त्यांच्याकडील प्रस्तावासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे इ.जोडण्यात यावी.
९. महाऊर्जातर्फे आवश्यक ती छाननी करण्यात येऊन प्रकल्पास तत्वतः मंजुरी देण्यात येईल. शासनातर्फे निधी प्राप्त झाल्यावर संबंधित घटकास सुपूर्द करण्यात येईल.

**क) इतर मार्गदर्शक सूचना**

१. नगरपालिका/महानगरपालिका यांना पथदिवे व पाणीपुरवठा यंत्रणा या दोन्हीसाठी अथवा एका प्रकल्पासाठी अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पाणीपुरवठा योजनांसाठी प्रस्ताव सादर करावा.
२. सदर योजने अंतर्गत संबंधित नगरपालिका / महानगरपालिका / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी ऊर्जा बचत संयंत्र उभारण्याच्या कामासाठी ठराव, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया इ. बाबी प्रचलित पद्धतीने त्यांच्या स्तरावर कराव्यात.
३. सदर प्रकल्पाची उभारणी व कार्यान्वयन पूर्ण झाल्यावर त्याची यशस्वीरित्या चाचणी झाल्यानंतरच संबंधितांस कामाचे ९० टक्के देयक अदा करावे. उर्वरित १० टक्के रक्कम यशस्वीरित्या हमी कालावधी पूर्ण केल्यानंतर अदा करण्यात यावी. सदर निधीतून पुरवठादारास अग्रीम रक्कम देण्यात येऊ नये.
४. सदर प्रकल्पातील संयंत्रांचा हमी कालावधी किमान २ वर्षे असावा. हमी कालावधीत संयंत्र पूर्ण देखभाल दुरुस्ती करुन कार्यान्वित ठेवणे आवश्यक आहे. संबंधित संस्थांनी हमी कालावधीनंतर सदर यंत्रणा कार्यान्वित रहावी यासाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीचा करार स्वखर्चाने करावा.
५. शासनातर्फे निधी प्राप्त झाल्यावर आवश्यक छाननीनंतर संबंधित संस्थेस निधी सुपूर्द करण्यात येईल. सदर निधीसाठी स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावे.
६. संबंधित संस्थेकडून प्रक्रियेस विलंब होत असल्यास निधी परत घेऊन इतर संस्थांना वितरित करण्याचे अधिकार महाऊर्जाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.
७. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ऊर्जा परीक्षण करावयाचे आहे. सदर ऊर्जा परीक्षण महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थांकडून करणे आवश्यक राहील.
८. सदर निधी हा ज्या कामासाठी मंजूर करण्यात आला आहे त्या कामावरच खर्च करावा. इतर कामांवर खर्च केल्यास त्यावर १० टक्के व्याज आकारण्यात येईल. सदर निधी हा चालू आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. खर्च न केल्यास सदर निधी परत घेण्याचे किंवा मुदतवाढ देण्याचे अधिकार महाऊर्जा राखून ठेवत आहे.
९. सदर निधीच्या विनियोगाचे प्रमाणपत्र महाऊर्जास पाठविणे बंधनकारक आहे.

C-39

१०. प्रकल्प राबविल्यावर १ महिन्यानंतर व नंतर सहा महिन्यांनी तसेच एक वर्षानंतर ऊर्जा बचतीचा सविस्तर अहवाल महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थेकडून प्रमाणित करुन वीज देयकासह महाऊर्जाकडे पाठवावा.

११. सदर प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती करणे व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी आवश्यक त्या बाबी करणे या संबंधित संस्थेने पार पाडावयाच्या आहेत.

१२. प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याचा तपशील असणारा फलक दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे.

१३. सदर योजनांसाठीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करण्याचे अधिकार महाऊर्जाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

१४. सदर मार्गदर्शक सूचना वित्त वर्ष २०१०-११ या वर्षासाठी प्रथम लागू राहतील.

## ANNEXURE 'I'

### I. GENERAL DETAILS

**Format for information regarding Street Lighting**

| S. NO. | PARTICULARS | DETAILS | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Name & Address of Municipal Council/Corporation | | | | |
| 2 | Name of Contact Officer | | | | |
| 3 | Designation | | | | |
| 4 | Telephone No. | | | | |
| 5 | Fax No. | | | | |
| 6 | No. of Street Lights | FTL | HPSV | Metal Halide | others |
| 7 | | | | | |
| 8 | No. of working hrs | | | | |
| 9 | No. of Switching Points | | | | |
| 10 | No. of Metered switching Points | | | | |
| 11 | Total load in KW | | | | |
| 12 | Total Electricity Consumption (KWh) per month | | | | |
| 13 | Total Electricity Bill per month in Rs. | | | | |
| 14 | Whether Energy Audit is Conducted? If Yes then when? & Please attach the copy of energy audit report. | | | | |
| 15 | Details methods /measures adopted for Energy Conservation & its quantum in Water Pumping | if Yes, please attach details separately | | | |
| 16 | Total cost of project in lacs | | | | |
| 17 | Total financial assistance requested | | | | |

**Name & Designation**

## ANNEXURE 'II'

### I. GENERAL DETAILS

**Format for information of Water Pumping /Supply Scheme**

| S. NO. | PARTICULARS | DETAILS |
|---|---|---|
| 1 | Name & Address of Municipal Council/Corporation /MJP | |
| 2 | Name of Contact Officer | |
| 3 | Designation | |
| 4 | Telephone No. | |
| 5 | Fax No. | |
| 6 | No. of Pump sets | |
| 8 | No. of working hrs | |
| 11 | Total load in HP/KW | |
| 12 | Total Electricity Consumption (KWh) per month | |
| 13 | Total Electricity Bill per month in Rs. | |
| 14 | Whether Energy Audit is Conducted? If Yes then when? & Please attach the copy of energy audit report. | |
| 15 | Total pumps to be covered under the proposed project ( location with meter no. to attached) | |
| 16 | Estimated Energy Saving in KWh | |
| 17 | Details about the Pumping Stations such as year of installation of individual pump discharge in MLD, its efficiency if measured, its overall working status, details of proposed systems, costing etc. | To be attached separately |

**Name & Designation**

C-43

परिशिष्ट - ३

## योजनेत सहभागी होणाऱ्या संस्थेने / विभागाने द्यावयाचं हमीपत्र

**(महानगरपालिकेचे आयुक्त /आयुक्तांनी प्राधिकृत केलेले उपायुक्त वा अन्य सक्षम अधिकारी / नगरपालिकेचे मुख्याधिकारी /महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी द्यावयाचे हमीपत्र)**

प्रमाणित करण्यात येते की ऊर्जा संवर्धनासाठी आमच्याकडील पथदिवे/पाणीपुरवठा योजना यामध्ये ऊर्जा बचत / संवर्धनाचा प्रकल्प राबविण्यासाठी शासनाकडील / महाऊर्जाकडील निर्णयाचे / मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करण्यात आले असून सदर सूचनांनुसार प्रकल्प राबविण्यात येईल. त्यासाठी तयार केलेल्या प्रस्तावासोबत दाखल केलेली माहिती योग्य असून ज्या ठिकाणी (Installation) सदर प्रकल्प प्रस्तावित आहे त्या ठिकाणी (Installation) यापूर्वी प्रकल्प राबविलेला नाही. सदर प्रकल्प राबविण्यासाठी संस्थेचा / विभागाचा हिस्सा म्हणून रु..... एवढी तरतूद संस्थेकडून / विभागाकडून करण्यात आली आहे. प्रकल्प राबविल्यावर तो पूर्ण क्षमतेने कार्यरत राहण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रस्तावासोबत पाठविलेली सर्व माहिती खरी असून सदर प्रकल्पाविषयी जनसामान्यात माहिती देण्यात येऊन ऊर्जा संवर्धनाविषयी जनजागृती करण्यात येईल.

**सही/-**
**(नाव-...............)**
**पदनाम-..............**
**शिक्का**